**<u>नि.दि.दावा क्र.२२३/२००६.</u>**
शालन यादव विरुध्द
वसंत पाटील वगैरे.
**CNR No. MHST**07-001355-2006.

## <u>निशाणी क्र.११२ कडील आदेश</u>

अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पडताळला. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्जातील कथनांप्रमाणे, प्रस्तुतचा दावा वादीचे उलट तपासाकरीता नेमलेला होता. त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ याचे वकीलांनी वादीचा उलटतपास घेतला व त्यादिवशी पूर्ण झाला. परंतु सदर दिवशी प्रतिवादी नं.५ व त्याचे वकील न्यायालयात हजर नसलेने प्रतिवादी नं.५ विरुध्द उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. सदरचा दावा हा वाटपाचा असलेने प्रतिवादी नं.५ यास वादीचा उलटतपास घेणेची संधी देणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. प्रतिवादी नं.५ यास वादीचा उलट तपास घेणेची संधी न दिलेस त्यास कायदेशीर हक्कापासून वंचित रहावे लागणार आहे व त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादी नं. ५ याने जाणुनबुजून वादीचा उलटतपास घेणेस टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी नं.५ हे वादीचा उलटतपास घेण्यास तयार आहेत. सबब त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द् करुन मिळण्याची प्रतिवादी नं.५ ने विनंती केली आहे.

३. वादीने अर्जास हरकत नोंदविली असून अर्जातील मजकूर खोटा असल्याने अमान्य केला आहे. सदरचा अर्जात नमूद केलेली कारणे ही अवास्तव असून केवळ दावा प्रलंबित ठेवण्याचा प्रतिवादी नं.५ याचा मानस आहे असे वादीचे म्हणणे आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची वादीने विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा दावा वाटप होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये उभयपक्षांचे मौलिक अधिकार समाविष्ट आहेत. अर्जासोबत

प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. दाव्याचे स्वरूप पाहता, प्रतिवाद नं.५ यास उलटतपासाची संधी देवविणे न्यायोचित होईल. परंतु झालेल्या विलंबा बाबत खर्च बसविणे आवश्यक आहे. सबब, मी पुढील आदेश पारीत करित आहे.

**आदेश**

१. अर्ज (नि.११२) रक्कम रु.१००/ इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. अर्ज मंजूर झाल्याने, प्रतिवादी नं.५ विरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रदद करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.५ ने उलटतपास त्वरीत नोंदविण्याचा आहे.

दिनांक— २९/१०/२०१८.
कराड.

(आरती कुलकर्णी)
४थे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड.